महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०१/ २०२२/120e                                                    दि. १९/०१/२०२३

24 JAN 2023

प्रति,

**१)** शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
**२)** शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर
**३)** शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
४) **लेखाधिकारी,**लेखापरीक्षण पथक, पुणे, अहमदनगर व सोलापूर
५) **अधिक्षक,**वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर व सोलापूर
६) **अध्यक्ष,** पुणे विभाग कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे
७) **सरचिटणीस,** पुणे विभाग कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे
८) **कार्याध्यक्ष,** पुणे विभाग कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे
९) **संबंधित सर्व पदाधिकारी,** पुणे विभाग कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे

**विषय:- पुणे विभागातील उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेसोबत सहविचार सभा दि. ०४/०१/२०२३ चे इतिवृत्त**

संदर्भ:- पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, सहविचार सभा दि. ०४/०१/२०२३

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार पुणे विभागातील उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात **दि. ०४/०१/२०२३ रोजी दु. ४.०० वा.** विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे येथे सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्त सोबत जोडलेले आहे.

**(औदुंबर उकिरडे)**
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे

**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे कार्यालय**

**विषय : पुणे विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे यांचेसमवेत सहविचार सभा इतिवृत्त.**

ठिकाण: शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे दालनात

दि. ४.०१.२०२३ वेळ : दु.४.००वा.

---

बुधवार दि.४.०१.२०२३ रोजी दु.४.०० वाजता मा. श्री. औदुंबर उकिरडे, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे., यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे, यांचेसमवेत सहविचार सभा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. बैठकीस संघटना पदाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), लेखाधिकारी, अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव व पदनाम | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | श्री औदुंबर उकिरडे, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे | उपस्थित |
| १ | श्रीम. मीना शेंडकर, सहा.संचालक, पुणे विभाग, पुणे | उपस्थित |
| २. | श्री. धनाजी बुटे, शिक्षण उपनिरीक्षक, पुणे विभाग, पुणे | उपस्थित |
| ३. | श्री. अनिल फुंदे, लेखाधिकारी, पुणेविभाग, पुणे | उपस्थित |
| ४. | श्री. प्रफुल्ल शहा, प्र.शास्त्र सल्लागार, पुणे विभाग, पुणे | उपस्थित |
| ५ | श्रीम.सुलभा वटारे, शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद,सोलापूर | उपस्थित |
| ६ | श्रीम. सुनंदा वाखारे, शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे | उपस्थित |
| ७ | श्री. अशोक कडूस, शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर | उपस्थित |
| ८ | श्रीम.कविता शिंपी, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक, (माध्यमिक) पुणे | उपस्थित |
| ९ | श्रीम.अर्चना सरदार, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक, (माध्यमिक) पुणे | उपस्थित |
| १० | श्रीम. स्वाती हवेले, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक,(माध्यमिक) अहमदनगर | उपस्थित |
| ११ | श्री. दयानंद कोकरे, लेखाधिकारी लेखापरिक्षण पथक, सोलापूर | उपस्थित |
| १२ | श्री. प्रमिला गिरी, लेखाधिकारी, लेखापरिक्षण पथक, पुणे | उपस्थित |
| १३ | श्री दिपक प्रधान, लेखाधिकारी, लेखापरिक्षण पथक, अहमदनगर | उपस्थित |
| १४ | प्रा.ए.एस.फुंदे, अध्यक्ष, जामखेड, अहमदनगर, पुणे विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना. | उपस्थित |
| १५ | प्रा. संतोष फाजगे, ,अध्यक्ष, पुणे जिल्हा कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| १४ | प्रा.गवळी एन ए,अध्यक्ष, कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, सोलापूर | उपस्थित |
| १५ | प्रा. लक्ष्मण रोडे, सरचिटणीस,पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना | उपस्थित |
| १६ | प्रा. समीर श्रीमंते,उपाध्यक्ष, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना | उपस्थित |
| १७ | प्रा. हिम्मत तोबरे, सहचिटणीस, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना | उपस्थित |
| १८ | प्रा.विक्रम काळे,समन्वयक, पुणे जिल्हा कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे | उपस्थित |
| १९ | प्रा. सुधाकर पडवळ,सल्लागार, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना | उपस्थित |
| २० | श्री रघुनाथ सोनटक्के,सदस्य, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना | उपस्थित |
| २१ | श्री सोपानराव कदम, सचिव,अहमदनगर जिल्हा कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, | उपस्थित |
| २२ | प्रा.दिपक क्षिरसागर, सचिव,सोलापूर जिल्हा कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, | उपस्थित |
| २३ | प्रा.अभंग एल एच, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना समन्वयक | उपस्थित |
| २४ | प्रा.भास्करराव ज-हाड, सल्लागार, राज्य महासंघ | उपस्थित |
| २५ | प्रा. मंच्छिद्र दिघे, कार्याध्यक्ष, संगमनेर | उपस्थित |
| २६ | प्रा. नवनाथ टकले निमंत्रक | उपस्थित |

सुरुवातीस सर्वांचे स्वागत करुन बैठकीत पुढीलप्रमाणे विषयावर चर्चा करण्यात आली.

**१) महानगरपालिका हद्दीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना घरभाडे दिले जात नाही.**

- शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी सांगितले की, मनपा हद्दीत गेलेल्या गावांची शासनाने निश्चित केलेली यादी तसेच नगरविकास उपायुक्तांनी दिलेले पत्र, मुख्याध्यापकांनी सादर करणे आवश्यक आहे. ज्या मुख्याध्यापकांनी/शाळांनी मनपा हद्दीत असल्याचे पुरावे सादर केलेले आहेत, त्यांना प्रचलित नियमानुसार घरभाडे देण्यात आलेले आहे. उदा. मनपा टॅक्स भरलेली पावती. नगर रचना आयुक्त यांचे पत्र मा.प/६६१६ दि.२३/१२/२०२२ तसेच महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्र.पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नीव-२२ नुसार वाघोली गाव मनापा हद्दीत समविष्ट झालेले आहे.त्यानुसार बीजेएस वाघोली यास मनपा हद्दीत समाविष्ठ करण्यात आले असल्याचे पत्र भारतीय जैन संघटना विद्यालय वाघोली यांनी सादर केले. त्यानुसार पुणे शहरासाठी असलेल्या प्रचलित नियमानुसार घरभाडे मिळणेबाबत मुख्याध्यापक, जैन संघटना विद्यालय वाघोली यांनी मागणी केली.

त्यानुसार प्रस्ताव वेतन पथकाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी निर्देशित केले. त्यास उपसंचालक यांनी मान्यता दिली.

२) **थकीत वेतन**

- अनुदान प्राप्त झाल्यानंतर फेब्रुवारी,२०२३ पर्यत ज्युनि.कॉलेजचे थकीत वेतन बिलांचे काम पूर्ण होईल असे उपसंचालक यांनी संगितले.

**३) प्रलंबित बिले**

- अनुदानाची मागणी केलेली आहे, अनुदान प्राप्त झाल्यानंतर प्रलंबित देयक पारीत होतील, असे अधीक्षक, वेतन पथक पुणे यांनी सांगितले.

- जी बिले मंजूर झाली आहेत, त्यांची यादी कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत मा.शिक्षण उपसंचालक यांनी अधिक्षक, वेतन पथक पुणे यांना सूचित केले.

**४) श्रीम. गिरी, लेखाधिकारी, पुणे यांच्याबाबत तक्रारी.**

- श्रीम. गिरी, लेखाधिकारी, पुणे यांच्याबाबत शिक्षकांच्या अनेक तक्रारी आहेत, त्यांचेकडून शिक्षकांची अडवणूक करण्यात येवू नये, नियमाप्रमाणे वेळेवर काम पूर्ण करुन दयावे ही विनंती असल्याचे संघटना प्रतिनिधी यांनी नमूद केले.

कॅम्प घेऊन नियमानुसार काम करणेबाबतच्या सूचना उपसंचालक यांनी लेखाधिकारी यांना दिल्या.

**५) भविष्य निर्वाह निधी स्लीपा**

- शिबिराचे नियोजन करावे, त्रुटी असतील तर दुस-या शिबिराच्या वेळी पूर्तता करण्यात यावी.

अधीक्षक, वेतन पथक यांनी पुणे् – कॅम्पचे नियोजन करण्यात आलेले असल्याचे सांगितले.

अधिक्षक अहमदनगर – जीपीएफ स्लीपाचे ९०टक्के काम पूर्ण झाले आहे, १०टक्के काम बाकी आहे. श्री.काळे, सेवानिवृत्त शिक्षक, खर्डा, शाळा अहमदनगर यांचे वैदयकीय बील प्रलंबित आहे, पुरवणी बिलामध्ये टाकता येईल असे अधिक्षक यांनी सांगितले.

**६) श्री.दहातोंडे, अहमदनगर, अनुकंपाचा प्रस्ताव आहे**

सदर प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.अहमदनगर यांचेकडे सादर केलेला असल्याचे संघटना प्रतिनिधी यांनी सांगितले.

त्रुटी पूर्तता झालेली असल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.अहमदनगर यांनी सांगितले.

**७) संच मान्यता**

- अहमदनगर, सोलापूर जिल्हयाचे संच मान्यता काम दि.७.०१.२०२३रोजी पूर्ण होईल, पुणे संच मान्यता ४२शाळा शालार्थला ॲड करायच्या राहिल्या आहेत, दि. १०.०१.२०२३ रोजी करण्यात येतील असे शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सांगितले.

**८)सोलापूर माध्यमिक, वेतनपथक** कार्यालयाकडून वैदयकीय बिले व इतर बिले वेळत मिळत नाही अशी तक्रार आहे.

- वेतनपथक कार्यालयाकडून वैदयकीय बिले व इतर बिले वेळत मिळत नाहीत याबाबत मी समक्ष अधिक्षकांशी चर्चा करते असे श्रीम.सुलभा वटारे, अति.शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

**९) श्री.नितीन क्षीरसागर, सेवानिवृत्त सेंट जोसेफ बॉईज स्कूल, खडकी पुणे**

- संवाद दिनामध्ये अर्ज केलेला आहे. श्रीम स्मिता नितीन क्षिरसागर सहा.शिक्षीका यांचे पती श्री नितीन क्षिरसागर सेंट जोसेफ स्कुल खडकी येथे कार्यरत होते त्यांचे निधन झालेले आहे.श्रीम स्मिता नितीन क्षिरसागर यांनी संबंधित प्राचार्य सेंट जोसेफ हायस्कुल खडकी यांना वारंवार पत्रव्यवहार करुनही त्यांचा पेन्शन प्रस्ताव पाठविला नाही व का पाठवत नाही याचे लेखी स्पष्टीकरणही दिलेले नाही तसेच मा.शि.अ. मॅडम नी सदर बाबतीत लक्ष घालुन उचित न्याय मिळवुन द्यावा असे प्राध्यापक संतोष फाजगे यांनी मांडले.

त्याविषयी संवाद दिनामध्ये सदर प्रकरण घेवुन निर्णय देवु असे मा शिक्षणाधिकारी वाखारे मॅडम यांनी सांगितले.

**विषय क्रमांक १) मागील दि. २२.०२.२०२२ रोजी झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त.**

- मागील इतिवृत्त मिळाले नसल्याचे संघटना अध्यक्ष यांनी सांगितले परंतु इतिवृत्त श्री. फाजगे, महासंघ उपाध्यक्ष यांचेकडे दिले असून संघाटनेतील सर्व पदाधिकारी यांना देणेबाबत तसेच सदर इतिवृत्त कार्यालयाच्या वेबसाईट वर अपलोड केलेले असल्याचे श्रीम. महिंद्रकर, सहा शिक्षण उपनिरीक्षक यांनी सांगितले, इतिवृत्ताची प्रत संघटना अध्यक्ष यांना समक्ष बैठकीच्या वेळी देण्यात आली.

यापुढे संघटना अध्यक्षांच्या नावे बैठकीचे पत्र तसेच इतिवृत्त पाठविणेबाबत सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक २) सन २०१९-२० पासूनच्या अर्धवेळ शिक्षक मान्यता आढावा घेणे**

.- सन २०१९-२० पासूनच्या अर्धवेळ शिक्षक मान्यता याबाबत ४.०५.२०२२ नंतरच्या मान्यतांबाबत मा. आयुक्त शिक्षण यांचेशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे शिक्षण उपसंचालक यांनी सांगितले

**विषय क्रमांक ३) विनाअनुदानितकडून अनुदानितकडे बदली झालेल्या अर्धवेळ व पूर्णवेळ शिक्षक** मान्यता आढावा घेणे.

- सदर बाबत प्रचलित शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेत येईल.

**विषय क्रमांक ४) अर्धवेळ शिक्षकांची त्याच संस्थेत पूर्णवेळ बढती, मान्यता आढावा घेणे.**

- अर्धवेळ मान्यता/सीएचबी मान्यता नियमानुसार देण्याचे काम सुरु आहे असे श्रीम.शेंडकर, सहा.संचालक यांनी सांगितले.

**विषयक्रमांक ५) प्रलंबित निवडश्रेणी व नियमित वेतनश्रेणी मान्यतेचा आढावा घेणे.**

- १.२४ वर्षे पूर्ण सेवा२.अतिरिक्त शैक्षणिक अर्हता,३.सेवांतर्गत प्रशिक्षण व ४.वरिष्ठ वेतन श्रेणी धारकांच्या २० टक्के या प्रमाणात निवडश्रेणी मंजूर होते असे श्रीम.शेंडकर, सहा.संचालक यांनी सांगितले.

सर्व निवडश्रेणी प्रस्ताव मंजुर झालेले आहेत. तपासून नव्याने सादर केलेले फक्त २ प्रस्ताव आहेत ८ दिवसात नियमात असले तर दिले जातील. असे श्रीम.शेंडकर, सहा.संचालक यांनी सांगितले.

**विषय क्रमांक ६) सन २०१९-२० पर्यंतच्या प्रस्तावित पदांचा जिल्हावार आढावा घेणे.**

- प्रस्तावित पदांची माहिती शासनाकडे गेलेली आहे, असे श्रीम.शेंडकर, सहा.संचालक यांनी सांगितले.

**विषय क्रमांक ७) जिल्हानिहाय माध्यमिक शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी, वेतन पथक अधिक्षक यांचे** कार्यालयाकडील प्रश्नांचा आढावा घेणे.

- जिल्हानिहाय माध्यमिक शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी, वेतन पथक अधिक्षक यांचे कार्यालयाकडील प्रश्नांचा आढावा जिल्हास्तरावर घेण्याचे निश्चित करण्यात आले व सभेचा समारोप झाल्याचे जाहीर करण्यात आले.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे